पनवेल (प्रतिनिधी) ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीविरोधात क्रांतीची पहिली ज्योत ज्वलीत करून देशात स्वातंत्र्याचा लढा उभारणारे आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांची प्रेरणा घेवून भावी पिढीने अन्यायाविरूध्द लढण्यासाठी कार्य रत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी धरणाकॅम्प येथे सोमवारी (दि.१७)केले.

आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या १३१ व्या पुण्यतिथी निमित्त धरणा कॅम्प येथील जयभवानी नवतरूण मंडळाच्यावतीने क्रांतीज्योत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कल्याणहून धरणाकॅम्प गाव ते क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगाव शिरढोण येथे क्रांतीज्योत नेण्यात आली. या क्रांतीज्योतीचे स्वागत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांना अभिवादन करताना आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्याचे स्मरण मनात सतत स्फुर्ती निर्माण करीत असते, अन्यायाविरूध्द लढण्याची ताकद त्यांनी फक्त पनवेल, रायगड, महाराष्ट्र राज्यालाच नव्हे तर संपूर्ण देशाला दिले आहे. महापुरूषांच्या स्मृतीतून नेहमी प्रेरणा मिळत असते म्हणूनच त्यांचे कायम स्मरण होणे गरजेचे असते असे सांगून क्रांतीज्योत कार्यक्रमाचे आयोजक जयभवानी नवतरूण मंडळ तसेच आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके क्रांतीज्योत शिरढोण यांच्या सामाजिक उपक्रमाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले. तसेच अन्यायाविरूध्द लढा देणारी ही क्रांतीज्योत सतत तेवत ठेवण्याचे काम सर्वांनी केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती हरेश केणी, कॉंग्रेसचे युवा नेते प्रल्हाद केणी, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, ह.भ.प.ॲड.आर.के.पाटील, रोहिंजणचे माजी सरपंच सुभाष पाटील, सरपंच रवी पाटील, महेंद्र पाटील, तानाजीराव कदम, ग्रामपंचायत सदस्या सुवर्णा कदम, रमेश कदम, एकनाथ म्हात्रे, अशोक पवार, नारायण भोईर, विलास पवार, पांडूशेठ पाटील, ह.भ.प.कानोजीराव पवार, लक्ष्मण पवार, श्रीकांतराव कदम, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके क्रांतीज्योतचे अध्यक्ष भरत भोईर, जयभवानी नवतरूण मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव कदम, सुभाष कदम, समिर कदम, सतिश कदम, प्रशांत कदम, शेखर कदम, सुनिल कदम, चेतन कदम, अनंत कदम, दत्ताराम पवार, मनोहर कदम, अशोक पवार, चंद्रकांत साळुंखे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.